राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४
Email ID: ropune@dtemaharashtra.gov.in

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

४१२, ई, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

कालमर्यादा - १५/०९/२०२०

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/पदोन्नती/२०२०/ 2687 दिनांक : 10 SEP 2020

**परिपत्रक :**

**विषय :- गट क मधील लघुटंकलेखक हे पद पदोन्नतीने भरणेबाबत..**

या कायार्लयाच्या अधिपत्याखालील शासकीय संस्थामधील **लघुटंकलेखक हे पद " ज्येष्ठता अधिन पात्रता "** विचारात घेऊन पदोन्नतीने भरावयाचे आहे. सदर पदासाठी वेतनश्रेणी व आवश्यक अर्हता खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | पदोन्नत पदाचे पदनाम, वेतनश्रेणी व प्रवर्ग संख्या | ज्या संवर्गातून / पदामधून पद भरावयाचे आहे त्याचे पदनाम | आवश्यक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ०१ | लघुटंकलेखक. (वेतन स्तर – एस ८ : २५५०० – ८११००) **(खुला ०१)** | गट - क मधील पदे | १) गट क मधील कनिष्ठ लिपीक / लिपीक टंकलेखक पदावर तीन वर्षे सेवा पूर्ण.<br>२) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण.<br>३) लघुलेखन वेग किमान ८० श. प्र. मि. व इंग्रजी व मराठी टंकलेखन वेग किमान अनुक्रमे ४० व ३० श. प्र. मि. शासकीय वाणिज्यिक प्रमाणपत्र आवश्यक.<br>४) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राची प्रत. (मागासवर्गीयांसाठी) |

सबब आपल्या संस्थेतील कनिष्ठ लिपीक / लिपीक टंकलेखक पदावरील जे कर्मचारी सदर पदासाठी आवश्यक असलेली अर्हता धारण करीत असतील त्यांची माहिती खालील प्रपत्रामध्ये भरुन दिनांक **१५/०९/२०२० पर्यंत** या कार्यालयास त्यांचे **अर्ज व आवश्यक त्या कागदपत्रांच्या साक्षांकित छायाप्रतींसह** सादर करावी.

| अ. क्र. | कर्मचा-याचे संपूर्ण नांव | पदनाम | वेतन श्रेणी (रुपये) | प्रवर्ग व जात | जन्म दिनांक | मूळ नेमणूक दिनांक | शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण झाल्याच्या वर्षासह) | जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त केले आहे किंवा कसे ? | शेरा / अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

कर्मचा-यांचे संस्थेतील उपलब्ध अभिलेख व सेवापुस्तके यामधील नोंदींवरुन, तसेच कर्मचा-यांकडून त्यांची शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे, दाखले इत्यादी घेऊन तपासावीत व माहिती या कार्यालयास सादर करावी.

... २ ...

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक वशिअ-१२५४/प्र.क्र.२६/११, दिनांक ०२ जून, २०१४ मधील तरतूदींनुसार गट क संवर्गातील प्रत्येक कर्मचा-याने त्याची स्वतःची मत्ता व दायित्वे याबद्दलची विवरणपत्रे विहीत प्रपत्रांमध्ये भरुन संस्था प्रमुखांकडे सादर करणे आवश्यक असल्याने, ज्या कर्मचा-यांनी उपरोक्त पदांवर पदोन्नतीसाठी अर्ज केले आहेत, अशा कर्मचा-यांनी त्यांचे मत्ता व दायित्वे याबाबतचे विवरणपत्रे विहीत प्रपत्रामध्ये भरुन सादर केली आहेत किंवा कसे ? याबाबत खात्री करुनच अर्ज सादर करावेत.

तसेच आपल्या संस्थेतील / कार्यालयातील सदर पदासाठी पात्र कर्मचा-याची माहिती या कार्यालयास प्राप्त न झाल्यास, तसेच पाठविलेल्या माहितीमध्ये कांही त्रुटी आढळल्यास त्यास सर्वस्वी संबंधित कर्मचा-यांना जबाबदार धरण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी., तसेच सदरचे पत्र आपल्या संस्थेतील / कार्यालयातील गट क मधील सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून त्याची पोहोच घ्यावी व पुढील कार्यवाही करावी.

संस्थेमध्ये मधील कर्मचारी उपलब्ध नसल्यास किंवा पदोन्नतीसाठी अर्ज करण्यास इच्छूक नसल्यास ***'निरंक'*** अहवाल सादर करण्यात यावा.

(डॉ. दि. रा. नंदनवार)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : संचालक / सर्व प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये / शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड / सर्व शासकीय तंत्रनिकेतने / म. रा. इन्स्टि. ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरिंग टेक्नॉलॉजी, पुणे / उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ विभागीय कार्यालय, पुणे यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्याकरिता.